MHJN050002002019

**दिवाणी दावा क्रं २२/२०१९**
**तुकाराम वि. इद्रावणी**

## निशाणी ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३९ रुल १ व २ प्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमाचा सादर केलेला आहे.

०२. वादीचे कथन की, प्रतिवादी क्र. ०१ ही वादीची भाऊजाई असून तीचे पती प्रल्हादराव बापूराव बोरकर हे दिनांक ०९/१०/२०१७ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना कोणतेही अपत्य नव्हते. मयत प्रल्हादराव हे वादी याचे मोठे भाऊ होते. मयत प्रल्हादराव यांना कायदेशीर वारस प्रतिवादी क्र. ०१, प्रतिवादी क्र. ०२ ते ११ आहेत. वादीचे भाऊ प्रल्हाद यांना वाटणीमध्ये शेत गट नंबर ११६ क्षेत्रफळ १ हेक्टर आणि गट नंबर ७६, ७७, ७८ मधून एकूण ११ एकर जमीन आलेली आहे (यापुढे सोईच्या दृष्टीने यांना दावा मिळकत असे संबोधण्यात येईल). याच गटातील ०७ एकर जमीन वादीचे वडील बापूराव यांना ठेवली होती. वडीलांच्या नावे ठेवलेली जमीन हातडी लघू तलावासाठी शासनाने सपांदीत केलेली आहे. त्याच काळात मयत प्रल्हाद यांनी कोणासही न कळू देता वडीलांच्या नावाची जमीन त्यांच्या स्वत:च्या नावे करून घेतली. त्याबाबत वादीने व ईतर भावांनी प्रल्हाद यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, जमीन तळयात गेलेली आहे, त्याचे पैसे आल्यावर मी सर्वांना वाटून देईल. तलावात गेलेल्या जमीनीचा मोबदला आल्यावर सर्वांच्या संमतीने गट नंबर ४० मध्ये ०२ हेक्टर ४० आर जमीन मयत प्रल्हादराव यांनी घेतली (यापुढे सोईच्या दृष्टीने यास दावा मिळकत असे संबोधण्यात येईल). तसेच प्रतिवादी क्र. ०२ यांना मयत प्रल्हाद यांनी रू ५०,०००/— दिले होते. मयत प्रल्हाद हे, शासनाकडून पुन्हा आलेले पैसे देखील सर्वांना वाटून देणार होते पण ते अचानक मयत झाले. प्रल्हाद हे मयत झाल्यामुळे व त्यांना

कोणतेही मुलबाळ नसल्यामुळे वादी व प्रतिवादी ०१ ते ११ हे त्यांचे हक्कदार आहेत. तसेच मौजे हातडी येथील घर क्रमांक ०१, ०२, ९९/१ (यापुढे सोईच्या दृष्टीने यांना दावा मिळकत असे संबोधण्यात येईल) हे मयत प्रल्हाद बोरकर याच्या नावावर असून त्यामध्ये वादी याचा ०७ वा हिस्सा आहे. घर क्रमांक ०१ हे बापूराव बोरकर यांच्या मालकीचे होते. परंतु मयत प्रल्हाद यांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्या बरोबर संगनमत करून नमुना नंबर ०८ वर स्वत:चे नाव नोंदवून घेतले होते. मयत प्रल्हाद बोरकर यांच्या बचत खात्यावर रूपये ६,९१,३१९/— व त्यावरील व्याज जमा आहे. त्यामध्ये वादीचा सातवा हिस्सा आहे. तसेच प्रतिवादी क्र. ०१ ने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज नंबर २५०/२०१७ दाखल केला होता. त्यास वादीने आक्षेप घेतला होता. त्यानंतर दिनांक २३/०१/२०१९ रोजी सदर अर्जाचा निकाल लागून फक्त पैसे काढण्याच्या हद्दीपर्यंत प्रतिवादी क्र. ०१ ला हक्क दिला आहे. अशा प्रकारे वादीचे भाऊ मयत प्रल्हाद यांना वाटणीमध्ये आलेली २३ एकर जमीन शिवाय वडीलांच्या नावे असलेली ०७ एकर जमीन, जी प्रल्हाद यांनी त्यांच्या नावावर करून घेतली होती, तसेच मयत प्रल्हाद यांच्या नावावर असलेले तीन घरे व बॅकेतील पैसे, अशा सर्वांमध्ये वादी व सर्व प्रतिवादी यांचा हिस्सा आहे. वरील संपुर्ण दावा मिळकतींमध्ये वादी यांचा हिस्सा आहे. वादीने प्रतिवादी क्र. ०१ कडे वाटणीची मागणी केली असता तीने त्यास नकार दिला. तसेच प्रतिवादी क्र. ०१ हिने दावा मिळकती विकण्याची धमकी दिली आहे. प्रतिवादी क्र. ०१ हि दावा मिळकती विकण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीं क्र. ०३ ते १० यांना समन्सची बजावणी होवुन देखील ते दाव्यात हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरूध्द प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश झाला. प्रतिवादी क्र. ०२ ने त्याचे म्हणणे निशाणी १७ वर दाखल करून वादीचे सर्व कथने मान्य केलेली आहेत. प्रतिवादी क्र. ०२ ने देखील त्याचा हिस्सा मिळण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र. ०१ व ११ यांनी निशाणी क्रं १९ नुसार त्यांचे

म्हणणे सादर करुन वादीने त्यांच्याविरुध्द केलेली मागणी नाकारली. प्रतिवादी क्र. ०१ ने तीचे पती प्रल्हादराव मयत झाल्याची बाब मान्य केली आहे. मयत प्रल्हादराव यांना प्रतिवादी क्र. ०१ शिवाय इतर कोणीही वारस नाहीत. त्यामुळे वादी व इतर प्रतिवादी याचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. दिलेली वंशावळ हि अर्धवट आहे. वंशावळीमध्ये इतर लोकांचा उल्लेख नाही. शेत गट नंबर ११६, ७६, ७७, ७८ या सर्व मिळकती मयत प्रल्हादराव यांच्या स्वकर्ष्टाजीत मिळकती आहेत. या सर्व मिळकतींच्या वाटण्या यापूर्वीच झालेल्या आहेत. वाटणीमध्ये मयत प्रल्हादराव व त्यांच्या भावांना मिळकती मिळालेल्या आहेत. तसेच मयत प्रल्हादराव यांनी, जमीन तळयात गेल्यानंतर आलेला पैसा प्रतिवादी क्र. ०२ ते ११ यांना वाटून देण्याचे आश्वासन दिलेले नाही. तसेच गट नंबर ४०, घर नंबर ०१, ०२, ९९/१ या सर्व मिळकती मयत प्रल्हादराव यांच्या स्वकर्ष्टाजीत मिळकती आहेत. या सर्व मिळकती मयत प्रल्हादरराव यांनी स्वत:च्या कमाईतून विकत घेतलेली आहे. मयत प्रल्हादराव हे पोलिस पाटील होते. त्यांना शासनामार्फत मानधन मिळत होते व ते शेती करून इतर व्यवसाय करत होते. तसेच बॅकेत असलेल्या रकमेशी देखील प्रतिवादी क्र. ०२ ते ११ यांचा कोणताही संबंध नाही.

०५. मयत प्रल्हादराव यांना ६ भाऊ होते. त्याचे बंधू केशवराव याच्या हिस्याला शेत गट नंबर ५४ मधील जमीन आली होती व ती त्यांनी त्याच्या चारही मुलांना समान वाटून दिली होती. तसेच वादी यांना शेत गट नंबर ९५ मौजे वलखेडा व शेत गट नंबर १०९ या गटामध्ये जमीन आलेली असून त्या जमीनी त्याच्या मुलांच्या नावे आहे. तसेच मयत विठ्ठल यास मदन नावाचा मुलगा असून त्यास मौजे हातडी येथील शेत गट नंबर ५५ मिळालेली आहे. तसेच मयत सखाराम यांस शिवाजी नावाचा मुलगा आहे. त्याला मौजे हातडी शेत गट नंबर ९३, ११० हि जमीन मिळालेली आहे. त्याच प्रमाणे मयत दादाराव यांना जग्गनाथ व बद्रीशाल हि दोन मुले असून त्यांना शेत गट नंबर ७० मध्ये जमीन मिळालेली आहे. तसेच त्याची काही मिळकत तलावामध्ये म्हणजेच १२ एकर जमीन गेली आहे. मयत उत्तमराव यांना माणिक व बापूराव

अशी मुले असून त्यांना मौजे हातडी शेत गट नंबर ७९, ७८ व ७१ या ठिकाणी जमीन मिळाली आहे. त्यामध्ये बरीचशी जमीन तलावामध्ये गेली आहे. तसेच मयत प्रल्हादराव यांच्या हिस्याला वादग्रस्त दावा मिळकती आल्या असून सदरील मिळकतीचे मालक व कब्जेदार मयत प्रल्हादराव हे होते. त्यांच्या मुत्यूनंतर प्रतिवादी क्र. ०१ हि दावा मिळकतीची मालक व कब्जेदार आहेत. मयत प्रल्हादराव व त्यांच्या भावांमध्ये वडीलोपार्जित मिळकतीच्या वाटण्या सन १९८२ मध्ये झाल्या होत्या व त्या अनुषंगाने मयत प्रल्हादराव व त्यांचे भाऊ याच्या नावे मिळकती झाल्या आहेत. प्रतिवादी क्र. ०१ हि मयत प्रल्हादराव यांची एकमेव वारस असल्यामुळे तीच्या नावे मा. दिवाणी न्यायालय व.स्तर यांनी अर्ज नंबर २५०/२०१७ मध्ये वारस प्रमाणपत्र दिले आहे. तसेच दाव्यात वादीने आवश्यक पक्षकार न जोडल्यामुळे व इतर मालमत्ता समाविष्ट न केल्याने दाव्याला कायदयाची बाधा येते. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६. अर्जातील कथने व प्रतिवादींच्या खुलाश्यावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे

| **अ.क** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हे त्यांना प्रथमदर्शनी प्रकरण आहे, हे सिध्द करतात काय? | नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजुने आहे काय? | नाही |
| ३ | जर मनाई हुकूम मिळाला नाही तर अपरमित असे कधीही न भरुन येणारे नुकसान वादी यांचे नुकसान होईल काय? | नाही |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

०७. वादी यांच्या विधीज्ञांनी वादीच्या अर्जाप्रमाणे युक्तीवाद केला. प्रतिवादीं क्रमांक ०१ व ११ च्या विधीज्ञांनी सुध्दा त्यांच्या खुलाश्याप्रमाणे युक्तीवाद केला.

**मुद्दा क्रं १**

०८. वादी याचे म्हणणे की, दावा मिळकत गट क्रमांक ११६, ७६ मधील जमीनी हया मयत प्रल्हाद यांना वाटणीमध्ये मिळाल्या होत्या. दावा मिळकत गट क्रमांक ४० मधील ०२ हेक्टर ४० आर जमीन हि तलावात गेलेल्या जमीनीच्या आलेल्या मोबदल्यातून मयत प्रल्हाद यांनी घेतली होती. तसेच घर क्रमांक ०१, चे मालक वादीचे वडील होते. तसेच घर क्रमांक ०२, ९९/१ चे मालक मयत प्रल्हाद होते. मयत प्रल्हाद यांना कोणतेही अपत्य नसल्याने त्यांना कायदेशीर वारस वादी आणि प्रतिवादी आहेत. त्यामुळे वरील मिळकतीमध्ये वादी यांचा ०७ वा हिस्सा आहे. अशा प्रकारे मयत प्रल्हाद यांचे वादी व इतर प्रतिवादी वारस आहेत, हे प्रथमदर्शनी सिध्द करण्याची जबाबदारी वादीची आहे.

०९. वादीने दाव्यासोबत दावा मिळकतींचे ७/१२ उतारे व नमुना ०८ चे उतारे दाखल केले आहेत. तसेच दिवाणी किरकोळ अर्ज २५०/२०१७ च्या न्यायनिर्णयाची प्रत दाखल केली आहे. सदर दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसते की, दावा मिळकतीवर मयत प्रल्हाद हा मालक या नात्याने कब्जेदार दिसतो. तसेच घर क्रमांक ०२ च्या नमुना ०८ चे अवलोकन केले असता असे दिसते की, सदरचे घर मयत प्रल्हाद यांनी पुष्पा विजयकुमार यांच्याकडून विकत घेतल्याचे दिसते. त्यामुळे नमुना ०८ वरून असे स्पष्ट दिसते की, घर क्रमांक ०२ हे मयत प्रल्हाद याची स्वतंत्र मालमत्ता आहे. तसेच घर क्रमांक ०१ हे वादीचे वडील यांच्या मालकीचे होते, असे वादीचे म्हणणे आहे. परंतु सदरची बाब सिध्द करण्यासाठी वादी यांनी तसा कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे घर क्रमांक ०१ चे मालक वादी यांचे वडील होते, हि बाब प्रथमदर्शनी सिध्द करण्यास वादी अपयशी ठरला आहे. तसेच घर क्रमांक ०१ व ९९/१ यांच्या नमुना ०८ च्या उता—याचे अवलोकन केले असता असे दिसते की, मयत प्रल्हाद हे मालक या नात्याने वरील घर मिळकतींच्या मालकी व कब्जात होते. तसेच मयत प्रल्हाद हे घर मिळकतींचे मालक वारसाहक्काने झाले, असे दर्शविणारा कोणतही कागदोपत्री पुरावा वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला दिसून येत

नाही. त्यामुळे वरील तिनही घर मिळकती हया मयत प्रल्हाद यांच्या स्वतंत्र मालमत्ता दिसतात.

१०. वादीचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या वडीलांची जमीन लघु तलावासाठी शासनाने संपादित केली होती आणि त्याच काळात मयत प्रल्हाद यांनी कोणास कळू न देता तलाठयाशी संगनमत करून त्यांच्या वडीलांची जमीन स्वत:च्या नावे करून घेतली. तलावात गेलेल्या जमीनीचा पैसा आल्यावर सर्वाच्या संमतीने मयत प्रल्हाद यांना दावा मिळकतीपैकी शेत गट नंबर ४० मध्ये ०२ हेक्टर ४० आर एवढी जमीन घेतली होती. परंतु वादी यांच्या वडीलांच्या नावावर कोणत्या गटात किती जमीन होती, शासनाने कोणाचे किती क्षेत्र संपादीत केले व त्याचा केव्हा व किती मोबदला आला, याचा कोणताही स्पष्ट उल्लेख वादीने अर्जात केलेला नाही. तसेच त्याबाबतीत कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले नाही. त्यामुळे मयत प्रल्हाद याच्या खात्यात जमा असलेली रक्कम शासनाकडून मिळालेल्या मोबदल्याचीच आहे, हि बाब प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. वादीने त्याबाबतीत फक्त मोघमपणे कथन केलेले आहे. त्यामुळे मोबदल्यातून आलेल्या पैशामधून दावा मिळकतीपैकी गट नंबर ४० मध्ये ०२ हेक्टर ४० आर जमीन मयत प्रल्हाद यांनी विकत घेतली होती, हि बाब प्रथमदर्शनी सिध्द करण्यास वादी हा अपयशी ठरला आहे. त्यामुळे दावा मिळकतीपैकी गट नंबर ४० मध्ये ०२ हेक्टर ४० आर जमीन मयत प्रल्हाद यांच्या स्वतंत्र मालकीची दिसते.

११. वादी यांनी दावा मिळकतीपैकी शेत गट नंबर ११६, ७६ मधील जमीनी हया वाटणीमध्ये मयत प्रल्हाद यांना मिळाल्याचे स्पष्टपणे कथन केले आहे. त्यामुळे वरील गटातील जमीनी हया मयत प्रल्हाद यांच्या स्वतंत्र मिळकती असल्याचे प्रथमदर्शनीच स्पष्ट दिसते.

१२. त्यामुळे आताच्या घडीला मयत प्रल्हाद हे दावा मिळकतींचे स्वतंत्र मालक असल्याचे दिसुन येते. वादीने असे म्हणणे आहे की, मयत प्रल्हाद यांस मुलबाळ नसल्यामुळे, ते व इतर प्रतिवादी हे त्याचे वारस आहेत. त्यामुळे त्याच्या देखील दावा मिळकतींमध्ये हिस्सा आहे. अभिलेखाचे अवलोकनावरून असे स्पष्ट दिसते की, प्रतिवादी क्रमांक ०१ हि मयत

प्रल्हाद यांची पत्नी आहे. त्यामुळे कायदयाच्या स्थापित तत्वाप्रमाणे मयत प्रल्हाद यांच्या मुत्यूनंतर त्याचे वारस म्हणून पत्नी या नात्याने प्रतिवादी क्रमांक ०१ हिच वर्ग क्रमांक ०१ ची वारस आहे. तसेच किरकोळ दिवाणी अर्ज २५०/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने वारस प्रमाणपत्र प्रतिवादी क्र. ०१ याच्या लाभात दिलेले असल्याचे दिसत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ०१ हि आजमितीला दावा मिळकतींची, मयत प्रल्हादराव यांची, एकमेव कायदेशीर वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. वादी अथवा प्रतिवादी क्र. ०२ ते ११ हे आजतरी प्रथमदर्शनी मयत प्रल्हाद याचे वारस असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांस प्रथमदर्शनी प्रकरण आहे, हे तो सिध्द करू शकला नाही. तसेच दावा मिळकतीं या मयत प्रल्हाद यांच्या स्वतंत्र मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. म्हणून प्रतिवादी क्र. ०१ हि पत्नी या नात्याने दावा मिळकतींची मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे कायदयाच्या स्थापित तत्त्वाप्रमाणे एकमेव व ख—या मालकाला त्याच्या मालमत्तेचा उपभोग घेण्याचा संपुर्ण अधिकार असतो. त्यामुळे मुळ मालकाच्या विरुध्द मनाई हुकूम आदेश पारित करुन मालमत्तेवरील उपभोगाच्या अधिकाराला बाधा आणत येत नाही.

१३. यदा कदाचित भविष्यात किंवा दाव्याचा गुणवत्तेवर निकाल देत असतांना जर वादी हा दावा मिळकतींमध्ये हिस्सा मिळण्यास पात्र आहे, असे ठरले व त्यापुर्वी जर प्रतिवादी क्रमांक ०१ ने तिच्या नावे असलेल्या कोणत्याही मिळकतीचे कोणत्याहीप्रकारे त्रयस्थ व्यक्तीला हस्तांतरण केले तर मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ ची त्याला बाधा येते आणि प्रकरण न्यायालयांत न्यायप्रविष्ठ असतांना केलेले हस्तांतरण हे वादीवर बंधनकारक नसते. त्यामुळे वादीच्या हिस्साच्या मागणीला सदर हस्तांतरणाची कोणतीही बाधा येणार नाही.

१४. महत्त्वाची बाब अशी की, वादीने प्रस्तुत अर्जात केवळ प्रतिवादी कमांक ०१ हि दावा मिळकतींचे खरेदीखत करुन देण्याच्या तयारीत आहेत, या भितीपोटी तिच्याविरुध्द मनाई हुकूमाची मागणी केली आहे. परंतु संपुर्ण वाद पत्राचे, अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने, दावा मिळकत

प्रतिवादी क्रमांक ०१ हि कोणाला, कुठे व कोणत्या पध्दतीने हस्तांतरण करणार आहे, याबाबत कोणताही उहापोह केलेला नाही. त्यामुळे कायदयाच्या स्थापित तत्त्वाप्रमाणे केवळ वादीच्या मनात हस्तांतरणाची भिती आहे म्हणुन मालमत्तेच्या मुळ मालकाला मालमत्ता हस्तांतरणापासुन प्रतिबंधीत करता येत नाही. त्यामुळे जर प्रतिवादीं क्रमांक ०१ विरुध्द कोणताही मनाई हुकूमाचा आदेश या घडीला पारित करणे म्हणजे केवळ कागदोपत्री केलेला आदेश असेल आणि त्यामुळे मुळ मालकाला त्यांची मालमत्ता उपभोगण्यापासुन वंचित ठेवणे होईल.

१५. अशा परिस्थितीत वर चर्चा केल्याप्रमाणे वादी हा जरी मयत प्रल्हाद यांचा भाऊ असला तरी जोपर्यंत त्याला हिस्सा मिळण्याचा अधिकार प्रथमदर्शनी प्रस्थापित करीत नाही आणि त्याला प्रथमदर्शनी केस आहे हे सिध्द करत नाही, तोपर्यंत प्रतिवादीं क्रमांक ०१ ला दावा मिळकतीपासुन तिच्या उपभोगाच्या अधिकारांना बाधा आणता येणार नाही. त्यामुळे वादी हा सकृत दर्शनी उत्तम प्रकरण त्याच्या बाजुने आहे, असे सिध्द करु शकला नाही. म्हणुन मी मुद्दा क्रं १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रं २ व ३

१६. वादी हा त्यास प्रथमदर्शनी प्रकरण आहे, हे तो सिध्द करु शकलेली नाही. तसेच संपुर्ण दावा मिळकतीं हया प्रतिवादी क्रमांक ०१ चे पती मयत प्रल्हाद यांचे नावे असल्यामुळे न्यायाचा समतोल वादी पेक्षा प्रतिवादी क्रमांक ०१ च्या बाजुने असुन जर कोणताही मनाई हुकूमाचा आदेश प्रतिवादी क्र. ०१ विरुध्द पारित केला तर वादींपेक्षा प्रतिवादीं क्रमांक ०१ चे अधिक नुकसान होईल. अशा प्रकारे मनाई हुकूम देण्याकरिता आवश्यक असलेले आधारभुत घटक वादी त्याच्या बाजुने सिध्द करु शकले नाही. म्हणुन मी २ व ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रं ४

१७. मुद्दा क्रं १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

# आदेश

०१. वादी याचां निशाणी ५ चा तातपुरता मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

RAHUL BHIKAN SURYAWANSHI

Digitally signed by RAHUL BHIKAN SURYAWANSHI
Date: 2023.02.03 11:05:34 +0530

ठिकाण — परतुर
दिनांक ०२.०२.२०२३

(राहुल भि.सुर्यवंशी)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परतुर

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | V. N. Thakur |
| Court | :- | Jt. C.J.J.D., Partur |
| Date of decision | :- | 02.02.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 02.02.2023 |
| Order uploaded on | :- | 03.02.2023 |